**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः रोशन सुदाम शिंदे,

वयः ३१ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणारः मुठवली, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एफ.पी.ठक्कर यांच्यामार्फत :**

०१. दिनांक १६/०६/२०२३ रोजी पोलिसांनी मला अंशुल कंपनीमधील ओ.सी. प्लांटचे बाहेर पंचनाम्याकरिता बोलाविले होते. त्यावेळी तेथे पोलिस, आमचे कंपनीचे साहेब होते. मला पोलिसांनी तेथील ड्रम दाखविले. ते तीन ड्रम होते. ते जीआजी ड्रम असून सिल्व्हर कलरचे होते. ते ड्रम अर्धे होते. तेथे पोलिसांनी पंचनामा तयार केला. त्या ठिकाणी असलेल्या ड्रमची पोलिसांनी तपासणी केली व तेथे फोटो काढले. सदर ड्रम पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी पंचनाम्यावर माझी सही घेतली होती.

०२. आता मला दिनांक १५/०६/२०२३ रोजीचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र.१८ देण्यात येतो.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एम.डी. पाटील यांच्यामार्फत सुरू.**

०४. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा केला त्यावेळी मी अंशुल

शासन वि. रोहित

कंपनीमध्ये नोकरीवर होतो. सदर ड्रम कंपनीचे मालकीचे असल्याची मी खात्री केली होती. सदर ड्रम कंपनीच्या आवारामध्येच होते. हे म्हणणे खरे नाही की, कंपनीला कामावरुन काढायचे असल्यास त्या कर्मचा–यावर चोरीचा आरोप केला जातो. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी चुकीचा पंचनामा तयार केला होता, तो त्यांनी माझे समक्ष केला नव्हता, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.10.19 16:40:09 +0530

स्थळ : रोहा.

(एस. एस. महाले)

दि. १९.१०.२०२४.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.